महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक:पोमसं/२३/५४/Accused Arrest-S.C.guidelines/१३५/२०२१ मुंबई, दिनांक:-१७ ऑगष्ट, २०२२

संदर्भ:- (१) या कार्यालयाचे Law of arrest and Hon. Supreme Court Guidelines बाबतचे स्थायी आदेश क्रमांक ०३/२०२२ समक्रमांक दिनांक २० जुलई, २०२२ आणि समक्रमांकाचे पत्र दिनांक १०.८.२०२२
(२) मा उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी प्रविण ज्ञानेश्वर शिंदे विरुध्द महाराष्ट्र शासन यांनी दाखल केलेला अॅन्टीसीपीटरी बेल अॅप्लीकेशन क्रमांक २१४२/२०२२ मध्ये दिनांक ०५ ऑगष्ट,२०२२ रोजी निर्गमित केलेले निर्देश.

विषय:- **Law of arrest and Honourable Supreme Court's Guidelines-Compliance with.**

****

उपरोक्त संदर्भ व विषयाकडे राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांचे वैयक्तिक लक्ष वेधण्यात येत आहे. उक्त संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी पोलीस कडून गुन्हयात केल्या जाणा-या अटके बाबत सविस्तर मार्गदर्शक तत्वे स्थायी आदेश क्रमांक ३/२०२२ अन्वये राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांच्या आणि त्यांच्याकडून त्यांच्या अखत्यारित कार्यरत असलेल्या सर्व तपासी अधिका-यांना अवगत करण्यासाठी निर्गमित केले आहेत. उक्त संदर्भ क्रमांक ०१ मधील स्थायी आदेश क्रमांक ३/२०२२ हे या कार्यालयाचे संकेत स्थळ www.mahapolice.gov.in वर Flash या शिर्षाका खाली व त्यातील इतर flash मध्ये दिनांक २१ जुलई २०२२ रोजीच प्रसिध्द करण्यात आले आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

०२. उक्त संदर्भ क्रमांक ०१ मध्ये नमूद केलेल्या स्थायी आदेश क्रमांक ०३/२०२२ ची दखल मा. उच्च न्यायालयाने उक्त संदर्भ क्रमांक ०२ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणात दिनांक ०५ ऑगष्ट, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशात घेतली आहे. या आदेशाची प्रत देखील यासोबत राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांच्या माहितीसाठी जोडली आहे.

०३. त्यातील परिच्छेद क्रमांक ०६ आणि ०७ कडे राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांचे वैयक्तिक लक्ष वेधण्यात आहे. त्याच्या पालनार्थ खालीलप्रमाणे सूचना राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना याद्वारे देण्यात येत आहे.

(अ) उक्त संदर्भ क्रमांक ०१ मध्ये नमूद केलेले स्थायी आदेश क्रमांक ०३/२०२२ हे सर्व पोलीस घटक प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारितील प्रत्येक पोलीस अंमलदारांना त्यांच्याकडील लिखित पत्राद्वारे अवगत करावी. तसेच सदरील स्थायी आदेश हे राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. त्यासाठी मा. उच्च न्यायालयाने १५ दिवसाचा कालावधी दिलेला आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

(ब) उक्त संदर्भ क्रमांक ०१ नुसार निर्गमित केलेल्या स्थायी आदेश क्रमांक ०३/२०२२ चे राज्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि प्रत्येक तपासी अधिका-यांनी काटेकोरपणे पालन करावे. त्याचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास, संबंधीत पोलीस अधिकारी तसेच त्यांचे पर्यवेक्षीय पोलीस अधिकारी हे शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील, याची नोंद घेण्यात यावी.

संलग्न:- वरील प्रमाणे.

(मिलिंद भारंबे)
विशेष पोलीस महानिरीक्षक, (कायदा व सुव्यवस्था),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे करिता.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक, (लोहमार्गसह)

प्रत:- अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस आयुक्त, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(क्रमाप)

सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस उप महानिरीक्षक
महासंचालक, ला.प्र.वि.,म.रा.,मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण, वाहतूक, आर्थिक गुन्हे विभाग, द.वि.प., ना.ह.सं., फोर्स वन, रा.रा.पो.ब.,महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक, पोलीस दळणवळण व परिवहन, म.रा.पुणे,
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, पीएडल्ब्यू, एसपीयू, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.ब.पुणे, नागपूर
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता अकादमी, पुणे आणि उप संचालक, डीटीएस, नाशिक
सर्व समादेशक, रा.रा.पो.ब., गट क्रमांक ०१ ते १६ आणि सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र,
प्राचार्य, यु.ओ.टी.सी., नागपूर.